।। ॐ ।।

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

जून २०२२



२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org



निघाल्या निघाल्या पालख्या निघाल्या । आनंदी वैष्णव अंतर्यामी ।।
जैसे शोधे माय भुकेले वासरू । तैसे मन धावे वैष्णवांचे ।।
विठुलाही ओढ आपुल्या भक्तांची । हुरहुर सारी नयनी प्रकटे ।।
साठवुनी दृश्य डोळ्यांत आपुल्या । स्मितहास्य ओठी रुख्मिणीच्या ।।
देव आणि भक्त दोघेही भुकेले । वाटेकडे डोळे लागलेले ।।

- श्री. शिरीष पटवर्धन



# उभी छावणी घरोघरी...

शिवरायांच्या मावळ्यांना जशा लढाया नवीन नाहीत तैसेची किशाभाऊ आणि झापूंच्या लेकरांना शिबिरे नवीन नाहीत पण... जवळपास ४० महिन्यांनी होणाऱ्या या शिबिरासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या यंदा कमी तर होतीच पण त्यांना हवं तेवढं कौशल्य व अनुभव देखील नव्हता. सगळीच नुकतीच मिसरुडं फुटलेली तरणीबांड पोरं हे समजताच तात्काळ सरसेनापती शुभमदादा जगताप यांनी हालचाली सुरू केल्या. भागप्रमुखांना निरोप धाडले. समोर परीक्षा, कामावर असलेल्या जबाबदाऱ्या, घरातील आजारपणं आणि कडक उन्हाळा यांचा सामना करत ही लढाई पार करण्याचा मनसुबा शाखा विभाग ठरवत होता. ‘तुळापूरी धाकलं राजं’ यांना मुजरा करण्यासाठी रणभूमी निश्चित झाली. फुलगावची सैनिकी शाळा. मग काय, सतीश बिराजदारने नोकरीवर सुट्ट्या घेऊन तर रोहन देशमुखने MBA चे शिक्षण थोडं बाजूला ठेवत जबाबदारी शिरावर घेतली. त्याला पश्चिमेकडून हत्यारबंद साथ दिली, मेघराज, किरण, ओम आणि नरवीर शाखेच्या सर्व युवकांनी. आशिष, सुजित, आकाश, सौरभ आणि रोहित यांनी शेवटपर्यंत हत्यारं खाली ठेवली नाहीत. मुळशी परगण्यातील धुरंदर मावळे, शेडगे व उभे या कामी फार उपयोगी आले. कुडज्याच्या पायगुडे सरदारांनी आपल्या वंशजांचे पराक्रम ध्यानात ठेऊन दुसऱ्याच दिवशी मोडलेल्या पायासाहित मैदान गाठले. अक्षय, केतन, मुरली हे तरुण रक्त शांत तरी कसे बसेल ? ते ही घुसलेच. त्यांनी सोबत गणेश तरंगे, ओम खंदारे, निखिल साबळे, सोहम इजंतकर, वैभव सकपाळ, पुष्कर सागडे यांना घोड्यावर बसायला लावलेच. लढाई सुरू होत असताना मावळे कमी असल्याने सरसेनापती थोडे गांगरले होते आणि वेताळ टेकडीच्या खोऱ्यातून आपली वानरसेना घेऊन कवी सुरेश पवार व हनुमान यांनी मैदान गाठले. मनोज बंडीवडार, गणेश कांबळे, प्रथम झिटे, हनुमान असे नामचीन योद्धे ज्यांनी भोजन सेनापती रुपेश उर्फ भावड्या यांना मजबूत रसद पुरवली. सोबत अन्य कामे देखील शिरावर घेतली. भागातून काही कमी पडू नये म्हणून अभिदा स्वतः मैदानात जातीने हजर होते. शिंग मनोऱ्यावरी वाजता उभी ‘छावणी घरोघरी’ हा शिवकाल सगळे अनुभवत होते. हर हर महादेव... युद्ध घोषणा देऊन तुकडी तुळापूरकडे निघाली.

# शाखा विभाग

### ◆ वर्धक गट शिबिर ◆



वर्धिनीचे शिबिर म्हटले की कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाला उधाण येते. मे महिन्यात शिबिरासाठीची एक बैठक झाली आणि जवळपास ३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शिबिराचे वारे वाहू लागले. कार्यकर्त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक बाजूनी, अनेक अनुभवांनी समृध्द करणारा विषय म्हणजे शिबिर. या शिबिराच्या पूर्व तयारीतील महत्त्वाची मोहीम म्हणजे धान्य संकलन मोहीम. आपल्या मातृसंस्थेच्या कामाची प्रभावी आणि तळमळीने मांडणी करून त्या विश्वासावर शिबिरासाठी आवश्यक सर्व शिधा देणगी रुपात मिळवणे हा उपक्रम आपण वर्षानुवर्षे यशस्वी केला आहे. दि. २८ मे रोजी १० वी ते टी.वाय.पर्यंतच्या ३०- ३५ युवांनी अतिशय उत्साहाने धान्य संकलन मोहीम यशस्वी करत शिबिरासाठी आवश्यक शिधा संकलित केला.

◆ **‘सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार’** या ‘स्व’-रूपवर्धिनीच्या ब्रीदवाक्यानुसार अनौपचारिक पद्धतीने जीवन शिक्षण मिळण्याचा अनुभव म्हणजे निवासी शिबिरे. लॉकडाऊन आणि महामारीच्या संकटात विद्यार्थ्यांनी ऑनलाइन शाखा तासिका, शिबिरे अशा विविध माध्यमातून शाखेच्या






संस्कारक्षम उपक्रमात सहभाग घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकत्र आणून त्यांच्यात वर्धिनीपण रुजवण्यासाठी आणि समाजाच्या वेगवेगळ्या भागातून जमलेल्या स्वयंसेवी शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी या शिबिरामध्ये विविध कृतीसत्रे, चर्चासत्रे, प्रबोधन, व्याख्याने, स्पर्धा, प्रेरणा सत्र अशा उपक्रमांची रेलचेल होती. शिबीराचा विषय ‘शाखा हेच शक्तिकेंद्र’ हा होता. विविध खेळांच्या माध्यमातून शारीरिक कुशलतेचे प्रयत्न केले गेले. मानसिक आणि वैचारिक गुणवत्ता वर्धनासाठी उपासना, प्रबोधन आणि प्रेरणासत्रांच्या माध्यमातून



विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर विविध पैलू पाडणारे उपक्रम घेण्यात आले.

निसर्गरम्य शिबिर परिसर आणि तेथील प्रेरणादायी स्थळांच्या भेटी, यासोबतच घोडेस्वारी, संस्था संचालक निवासस्थानी राहण्याची संधी अशा घटनांमुळे शिबिरार्थींच्या अनुभव विश्वात भर पडली. शाखा विभाग प्रमुख शुभम जगताप यांनी उद्घाटन सत्रात शिबिर उद्देश, संकल्पना शिबिरातील कार्यक्रम, दिनक्रम व उपक्रम माहिती सांगितली. शिबिरातील व्यवस्था व गटशिक्षक यांचा परिचय शिबिरार्थींना करून देण्यात आला. जोनाथन पक्षाच्या समर्थ कथा, गरिबीतून सावरून शिक्षण संकुलाच्या उभारणीचा श्री. पायगुडे सरांचा प्रवास आणि सेवाव्रती कै. ज्ञानेशजी पुरंदरे यांच्या जीवन स्मृतींना उजाळा अशा प्रेरणा सत्रांनी शिबिरार्थी भारावून गेले. किशाभाऊंच्या परिसस्पर्शापासून ते भारत



भ्रमणपर्यंतचा प्रवास खडतर होता याची सर्व वर्धक व युवकांना नक्कीच जाणीव झाली.

मैदानामध्ये कबड्डी आणि लंगडीचे साखळी सामने, दोन गटातील खेळ, युद्धाचे खेळ व चौकोनातील खेळ घेण्यात आले. वर्धक गटाला समतेचे प्रशिक्षण देण्यात आले. पहाटेच्या मंगल वातवरणात वर्धकांना उपासनेचे महत्त्व सांगून गायत्री मंत्र, एकात्मता स्तोत्र, बुद्धवंदना अशा मंत्रांची उपासना घेण्यात आली. श्रमप्रतिष्ठा, संवेदनशीलता, सदचारित्र्य या मूल्यांविषयी प्रबोधन सत्रात मार्गदर्शन झाले. व्यक्तीमत्व विकासात स्वतःचे मत मांडता येण्याला खूप महत्त्व आहे. वर्धकांमधील हा गुण वाढीस लागावा म्हणून मुलांच्या भावविश्वातील महत्त्वाच्या विषयांवर जसे शाखा का व कशासाठी वर्धिनीतला मी आणि बाहेरील मी, सोशल मीडियाचा वापर कशासाठी–कोणासाठी, या विषयांवर चर्चासत्रे घेण्यात आली. रात्र कार्यक्रमात बुद्धीला चालना देणारे उपक्रम शक्ती बुद्धी, प्रश्नमंजुषा, डॉक्युमेंटरी (उरी : द सर्जिकल स्ट्राइक) यावर मत मांडणी घेण्यात आली.

गणेशोत्सवात घेण्यात येणाऱ्या पथनाट्याची पूर्वतयारी व सराव म्हणून पथनाट्य कार्यशाळा सुरेश पवार आणि निलेश धायरकर यांनी घेतली. शिबिरार्थींचे गट पाडून त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. शाखा का व कशासाठी, स्त्रीभ्रूण हत्या, सोशल मिडिया, संविधान जागरूकता अशा विषयांवर वर्धकांनी शिबीरात पथनाट्याचा सराव करून सादरीकरण केले.



क्षेत्रभेट हे वर्धिनीच्या कामातील एक महत्त्वाचे अंग आहे. वर्धकांनी तीर्थक्षेत्र तुळापूर संभाजी महाराज बलिदान स्थानाचे दर्शन घेतले. संगमेश्वर मंदिरात श्री. महेश पवळे यांनी छत्रपती संभाजी महाराज चरित्र मांडणी केली. वर्धक तन्मय चलवादी याने अंगावर शहारे आणणारी अशी शंभूगाथा सादर केली. समारोप सत्रात श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या उपस्थितीत बक्षीस समारंभ पार पडला.





## ◆ वर्धिका शिबिर ◆



**◆ स्थळ – सरस्वती विद्यामंदिर, कर्वेनगर, कालावधी – ६ ते ९ मे २०२२,**

**◆ विषय – कृतीतून शिक्षण.**

शिबिराचे उद्घाटन सौ. शुभांगी तांबट ताईंनी केले. या सत्रात ताईंनी 'वर्धिनीत यायचे...' हे पद्य, 'साऱ्याच कळ्यांना...' ही कुसुमाग्रजांची कविता व वर्धिनीची प्रार्थना यातून आपण मुलगी म्हणून वर्धिनीत कशासाठी यायचे, वर्धिनीचे काम काय आहे, युवती झाल्यावर आपण वर्धिनीचे काम कसं करू शकतो या गोष्टी स्पष्ट केल्या.

विषयाला अनुसरून पुढील सत्रे झाली.

◆ गायन व चित्रकला – दिक्षा बजाज ताईने पानांचे वेगवेगळे आकार काढून रंगवायला व भेटकार्ड तयार करायला शिकवली. मकरंद पळसुले दादाने गाणं, पद्य म्हणताना आवाज कुठे वाढवायचा त्यातून त्याचा अर्थ भाव कसा आपल्यापर्यंत पोहोचतो हे सादरीकरणातून स्पष्ट केले.





◆ अनुभव कथन - वर्धिनीतील एक युवक-युवतींचा गट आसाम दौरा करून आला होता. त्यांनी तिकडे भास्कर संस्कार केंद्राने मुलांसाठी घेतलेल्या शिबिरात योग, कला व चर्चासत्र याची जबाबदारी घेऊन काम केले. या शिबिरातले काही अनुभव, तेथील ऐतिहासिक स्थळांची व सणांची माहिती त्यांनी सांगितली. यातून वर्धिनीतल्या विविध उपक्रमांतून होणारे शिक्षण आपण मोठे झाल्यावर इतरांपर्यंत कसे पोहोचवले पाहिजे हे लक्षात आले.

◆ वाद्य परिचय - या सत्रात हरी धायगुडे व कौशिक केळकर या दादांनी चित्रफितीतून (व्हिडिओ) वाद्यांची ओळख करून दिली. आवाज ऐकून वाद्य ओळखा हा खेळ घेतला. ही ओळख लक्षात राहावी म्हणून पद्याला ताल/ठेका द्या व त्याचे सादरीकरण अशी गटशः स्पर्धा झाली. सौ. दीपाली पवार व श्री. सुमित डोळे हे परीक्षक म्हणून उपस्थित होते.

◆ **प्रेरणा सत्र** - मा. शिरीष पटवर्धन सरांनी वर्धिनीतून घडलेल्या युवतींची व त्यांच्या कामाची ओळख मुलींना करून दिली. काम करताना त्यांना आलेल्या अडचणींवर त्यांनी कशा प्रकारे मात केली हे ऐकून जिद्दीने, नेटाने काम केले पाहिजे हे लक्षात आले.





◆ समृद्धी यादव ताईने मा. रामभाऊ डिंबळे सरांची मुलाखत घेतली. यातून कोणती पुस्तके वाचावीत, आपले मित्र कसे असावेत, अभ्यास कसा करावा यावर विशेष मार्गदर्शन झाले.



◆ **स्वामी सुबोधानंद शाखा** - उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये शाखेत वाद्यवादन, वक्तृत्व, शक्ती बुद्धी, टाकाऊपासून टिकाऊ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. बक्षीस समारंभाला वर्धकांना शाबासकी देण्यासाठी भागप्रमुख सतीश बिराजदार, भाग युवा प्रमुख अक्षय मुळे आणि युवक प्रमुख ऋषिकेश कुलकर्णी उपस्थित होते.

◆ **राजश्री शाहू महाराज शाखा** - साप्ताहिक शाहू करंडक स्पर्धा

दि. २४ मे ते ३१ मे या आठवड्यात शाहू करंडक स्पर्धा घेण्यात आली. प्राथमिक संघ शिक्षा वर्ग पूर्ण केलेल्या दहावीच्या वर्धकांना गट प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली. या सात दिवसात विविध मैदानी खेळ, स्पर्धा जसे चक्रव्यूह, स्नॅप पॉईंट, पाककला, पद्या मंजुषा घेण्यात आल्या. यामुळे उपस्थिती वाढली. श्री. योगेश माकणे सरांच्या उपस्थितीत बक्षीस समारंभ झाला. नियमित दैनंदिनी लिहिणारा, सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होणारा आदर्श वर्धक म्हणून आदर्श गायकवाडने बाजी मारली. त्याचबरोबर आदर्श खेळाडू म्हणून लहान गटातून गणेश सूर्यवंशी व मोठ्या गटातून प्रताप पवार यांनी उत्तम खेळी करून मैदान गाजवले व वेळोवेळी गटाला विजय मिळवून दिला. या देशाचे सेवक आम्ही भाव मनी हा नित्य वसे राष्ट्रभक्ती हृदयात जागण्या शाखा आमुची चालतसे.

◆ **क्रांतिज्योती सावित्री शाखा** - दि. ०५ जूनला पर्यावरण दिनानिमित्त शाखेने भैरवसिंह घोरपडे उद्यानातील परिसराची स्वच्छता केली. कोविड-१९ नंतर प्रथमच झालेल्या या मोहिमेत उद्यानातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना वर्धिकांनी मदत केली.

## श्रद्धांजली

आंतर्राष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ चित्रकार **श्री. रवी परांजपे** यांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.**